# मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम (१०+३)

# Diploma in Fisheries Engineering (10+3)

## माहिती पुस्तिका २०११-१२

## Prospectus 2011-12

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली-४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)
Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli-415 712, Dist. Ratnagiri (Maharashtra)

**महामहीम के. शंकरनारायण**
कुलपती
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली.
आणि राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.
दूरध्वनी क्र. (०२२) २३६३२६६०
फॅक्स क्र. (०२२) २३६३३२७२

**मा. ना. श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील**
कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि
प्रतिकुलपती, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
दूरध्वनी क्र. (०२२) २२०२२१००
फॅक्स क्र. (०२२) २२०२३९२२

**मा. ना. श्री. विजयराव कोलते**
उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
दूरध्वनी क्र. (०२०) २५५३७४८१
फॅक्स क्र. (०२०) २५५३३७६४

**डॉ. विजय बाळकृष्ण मेहता**
कुलगुरु,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
दूरध्वनी क्र. (०२३५८) २८२४११, विस्तार १०९
फॅक्स क्र. (०२३५८) २८२०७४

**डॉ. चंद्रमोहन व्ही. भांबुरे**
शिक्षण संचालक,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
कार्यालय (०२३५८) २८२४११, विस्तार १३१
फॅक्स व दूरध्वनी क्र. (०२३५८) २८४३०८

**डॉ. शेखर कोवळे**
प्रकल्प अधिकारी, मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम आणि
सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी.
दूरध्वनी क्र. (०२३५२) २३२२४१, २३२६७८
फॅक्स क्र. (०२३५२) २३२९८७

**श्री. प्रविणकुमार अण्णा यादव**
कुलसचिव/उपकुलसचिव,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
दूरध्वनी क्र. (०२३५८) २८२४११, विस्तार १५७
फॅक्स (०२३५८) २८३०६५

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे नाव व पत्ता | ४ |
| ३ | प्रवेश पात्रता | ४ |
| ४ | उमेदवारांसाठी सूचना | ४- ७ |
| ५ | प्रवेश पध्दत | ७ - ८ |
| ६ | आरक्षित जागा | ९ - १० |
| ७ | अधिभार | १० |
| ८ | अभ्यासक्रम, अध्यापन आणि मूल्यमापन | ११ - १३ |
| ९ | प्रमाणपत्र | १३ |
| १० | परीक्षा शुल्क, परीक्षेचा अर्ज, प्रवेशपत्र इत्यादी | १३-१४ |
| ११ | वैद्यकीय प्रमाणपत्र | १४ |
| १२ | उपस्थिती | १४ |
| १३ | पून: प्रवेश | १४ |
| १४ | विद्यार्थ्यांची जबाबदारी | १४ |
| १५ | शैक्षणिक सहली | १४ |
| १६ | वसतीगृह निवास | १४ |
| १७ | अनुचित गैरशिस्त वर्तन | १४ |
| १८ | शैक्षणिक शुल्क | १५ - १६ |
| १९ | सूचना | १६ |
| २० | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम - प्रवेश कार्यक्रम २०११-१२ | १६ |
| | परिशिष्ठ - १ शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र (नमूना) | १७ |
| | परिशिष्ठ - १ मासेमार असल्याचे प्रमाणपत्र (नमूना) | १८ |
| | परिशिष्ठ - २ शेतकरी असल्याचा दाखला (नमूना) | १९ |
| | परिशिष्ठ - २ मासेमार असल्याचा दाखला (नमूना) | १९ |
| | परिशिष्ठ - ३ वैद्यकीय दाखला (नमूना) | २० |

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## मत्स्य विद्या शाखा, रत्नागिरी

### मत्स्य अभियांत्रिकी विषयातील तीन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम (१०+३)

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत शिरगाव जिल्हा रत्नागिरी येथे ३ वर्षांचा मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करणेबाबतचा महाराष्ट्र शासन निर्णय क्र. कोकृवि २०१०/प्र.क्र. १०१/७ – अे दि. ६/०८/ २०१०

**१. प्रस्तावना**

मत्स्य अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमाची आखणी ही मुख्यत: स्वयंरोजगार निर्मितीचे उद्दिष्ट समोर ठेवून करण्यात आलेली आहे. मत्स्य अभियांत्रिकी शास्त्रातील उत्तम दर्जा प्राप्त होण्याइतके शिक्षण देऊन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविणे, मत्स्योत्पादनानंतर मासळीची आणि मासळीच्या पदार्थांची गुणवत्ता उत्तम ठेवणे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी येणाऱ्या व्यवसायांच्या आव्हानांची यशस्वीरीत्या पूर्तता करण्यासाठी सक्षम मनुष्यबळ निर्माण करणे हे प्रमुख उद्देश या पदविका प्रशिक्षणात अंतर्भूत आहेत.

भारताला विविध प्रकारची समुद्रीय परिस्थिती निसर्गाने उपलब्ध करुन दिली आहे. म्हणून अनेक प्रकारची मासळी आपल्या देशांत मिळते. बराचसा मत्स्यमाल, व्यापारी बाहेरच्या देशांत निर्यात करु लागले आहेत. यांत गोठविलेली कोळंबी, मासे आणि इतर मत्स्य पदार्थांची निर्यांत मोठ्या प्रमाणावर होत आहे. तरी, पण अशाप्रकारच्या मत्स्य निर्यातीस अजूनही खूप मोठा वाव आहे. त्याकरीता निर्यात योग्य मत्स्यमाल तयार करण्यासाठी निरनिराळ्या यंत्रांचा वापर करावा लागतो. त्यादृष्टीने त्याक्षेत्रातील तंत्रज्ञ तयार करण्यासाठी मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करणे आवश्यक झाले आहे. प्रशिक्षित मनुष्य बळ हे उपनिर्दिष्ट निर्यात योग्य मालाचे उत्पादन सक्षमपणे करेल, हे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे.

आज मत्स्यव्यवसाय क्षेत्रात जे असंघटीत मनुष्यबळ या व्यवसायाची तांत्रिक बाजू सांभाळत आहेत, ते बहुतांशी लोक याबाबींचे प्रशिक्षण न घेतलेले आहेत. पारंपारीकरित्या या व्यवसायात अनेक वर्षे कार्यरत राहील्याने अनुभवाच्या बळावर मिळालेल्या ज्ञानाच्या आधाराने हे लोक या व्यवसायाची तांत्रिक बाजू सांभाळत आहेत. यासाठी त्यांनी कित्येक वर्ष या क्षेत्रात काम करुन हा अनुभव मिळवला आहे. या पार्श्वभूमीचा आणि त्यासाठी दिल्या जाणाऱ्या कार्यकालाचा विचार करता, योग्य प्रशिक्षण घेऊन या सर्व तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास केलेले मनुष्यबळ त्वरीत उपलब्ध होणे आवश्यक आहे. मत्स्य अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमामुळे तांत्रिकदृष्ट्या '**कुशल**' असे मनुष्यबळ मत्स्य व्यवसायांस मिळवून देणे शक्य होणार आहे. योग्य प्रशिक्षण मिळाल्याने या संघटीत मनुष्यबळांतून मत्स्य व्यवसायाच्या मत्स्य अभियांत्रिकी मधील विविध क्षेत्रांसाठी तंत्रज्ञ तर मिळतीलच त्याशिवाय स्वयंरोजगाराच्या माध्यमातूनही अर्थार्जनासोबतच रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

या अभ्यासक्रमांतर्गत मासेमारी नौका बांधणी, नौका उपकरणे दुरुस्ती व देखभाल, मत्स्य शेतीसाठी तलाव बांधणी इ. मत्स्य अभियांत्रिकी विषयाशी निगडीत आवश्यक उपविषयांच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव आहे. हा अभ्यासक्रम अभ्यासत असताना विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार पुढील ४ विषयांपैकी एका विषयाचे सम्यक ज्ञान व प्रत्यक्ष क्षेत्रातील एका वर्षाचा अनुभव आत्मसात

करुन पदविका अभ्यासक्रम पूर्ण करतील.

**अ. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मासेमारी नौका बांधणी व मरीन इंजिन)**

**ब. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मासेमारी तंत्रज्ञान)**

**क. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मत्स्य प्रक्रिया आणि शीतकीकरण यंत्रसामुग्री)**

**ड. मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मत्स्य संवर्धन अभियांत्रिकी)**

हा तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले यशस्वी विद्यार्थ्यी/विद्यार्थीनी बॅचलर ऑफ फिशरीज सायन्स (बी. एफ. एस. स्सी./B.F.Sc.) या पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षात गुणवत्तेनुसार मर्यादीत संख्येच्या प्रमाणात प्रवेशाकरीता पात्र राहतील.

**२. मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या मत्स्य विद्यालयाचे नाव व तपशील**

**शैक्षणिक अर्हता - १० वी उत्तीर्ण     शिक्षण कालावधी - ३ वर्षे (सहा अर्ध सत्रे)**

| अ.क्र. | विद्यालयाचा सांकेतांक | मत्स्य विद्यालयाचे नांव | दूरध्वनी | प्रवेश क्षमतेविषयी शेरा | अभ्यासक्रमाचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | -- | मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालय, शिरगाव, रत्नागिरी पिन - ४१५ ६२९ | दूरध्वनी ०२३५२-२३२६७८ फॅक्स. ०२३५२-२३२९८७ | एकूण २० विद्यार्थी | इंग्रजी |

**३. प्रवेश पात्रता**

मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक शालान्त परीक्षा (एस.एस.सी/१० वी) किंवा समकक्ष परीक्षा ५०% एकत्रित गुण मिळवून (महाराष्ट्र राज्यातल प्रमाणीत अनुसूचीत जाती व जमाती यांचेसाठी कमीतकमी ४५% एकत्रित गुण मिळवून) उत्तीर्ण झालेला असावा.

**नोंद :** एकत्रित गुण म्हणजेच उमेदवाराने सर्व विषयांमध्ये (बंधनकारक विषय किंवा ऐच्छिक विषय मिळविलेले एकूण गुण)

**४. उमेदवारांसाठी सूचना**

४.१ प्रवेशासाठी विहित नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

४.२ प्रत्येक उमेदवाराने फक्त एकच प्रवेश अर्ज भरावा.

४.३ उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (मूळ प्रती जोडू नयेत) पुढील अनुक्रमांकानुसार जोडाव्यात.

४.३.२ ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे, त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालय/महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतू प्रवेश घेतल्यानंतर उमेदवाराने ७ दिवसाच्या आत शाळा सोडल्याचा दाखला जेथे प्रवेश घेतला

आहे तेथे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो. तसेच ज्या उमेदवाराचा काही कारणाने शैक्षणिक खंड पडला असेल तर त्या उमेदवारांनी त्या संबंधीचे तहसिलदार यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४.३.३ उमेदवाराचे वडील/आई अथवा आजोबा/आजी यांचे नांवे शेतजमीन/मासेमारी नौका आहे, असे दर्शविणारा तलाठी /बंदर अधिकारी यांनी दिलेला २००९ किंवा २०१० या वर्षाचा ७/१२ व ८अ चा उतारा तहसिलदाराचा दाखला जोडावा. जर उमेदवाराचे आई/वडील हयात नसतील तर उमेदवाराचे भाऊ/बहीण अथवा पितृ/मातृ कुळाकडील चुलते, मामा यांचे नांवे शेतजमीन/मासेमारी नौका असलेला ७/१२ चा उतारा तहसीलदाराचा दाखला / बंदर अधिकारी यांनी दिलेला दाखला उमेदवाराने जोडल्यास सदर शेतजमिनीत/मासेमारी नौकेत उमेदवाराचा कायदेशीर हिस्सा असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर केले तर अशा उमेदवारास १२ गुणांचा अधिभार मिळण्यास तो पात्र राहील. उमेदवारास सूचीत करण्यात येते की, ७/१२ उताऱ्याच्या आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या प्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

४.३.४ भूमीहीन शेतमजूर असल्याबाबतचे प्रमाणपत्र : उमेदवाराचे वडील/आई भूमीहीन शेतमजूर/नौकाहीन मासेमार असल्यास भूमीहीन शेतमजूराचे/नौकाहीन मासेमारीचे उपजीविकेचे शेतमजूरी/मासेमारी करणे हे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे जरुरीचे आहे. हे प्रमाणपत्र तहसिलदार अथवा नायब तहसिलदार यांचे सही शिक्क्यानिशी सन २००९ व २०१० या वर्षातील असावे (दाखल्यावर उमेदवाराच्या नावाचा उल्लेख असावा). सदर प्रमाणपत्रधारक उमेदवार शेतकरी कुटुंब (AG category) ठेवण्यात आलेल्या आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही.

४.३.५ सन २०११-१२ या वर्षातील तहसिलदार किंवा नायब तहसिलदार यांनी दिलेले शेतकरी/मासेमार असल्याबाबतचे प्रमाणपत्र, या प्रमाणपत्रात उमेदवार त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/ आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे जमीनधारक/नौकाधारक किंवा कूळ असून त्या जमिनीद्वारे/मासेमारीद्वारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे, असे नमूद केलेले असावे.

४.३.६ उप जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी/तहसीलदार/तालुका दंडाधिकारी यांनी विहित नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र.

४.३.७ विमुक्त जाती - अ, भटक्या जमाती - ब, भटक्या जमाती - क, भटक्या जमाती - ड, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिकाऱ्यांनी दिनांक १-४-२०१० नंतर दिलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.३.८ प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला : महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी District Rehabilitation/ Resettlement Officer) यांनी उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडिल / आई किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली /झालेली आहे. असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर **या सवलतीचा फायदा ज्यांना द्यावयाचा आहे, त्यांच्या नावाचा उल्लेख असणे**

**आवश्यक आहे.**

४.३.९ राष्ट्रीय सेना (एन्.सी.सी.) प्रमाणपत्र, हवाईदल/नौदल/स्थलसेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक/मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र.

४.३.१० उमेदवाराने इ. ८ वी ते १० वी या कालावधीत क्रीडा/सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला असल्यास, जिल्हा क्रीडा अधिकारी/क्रीडा परिषद/जिल्हा शिक्षणाधिकारी/तालुका पातळीवरील अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र अधिभारासाठी ग्राह्य धरण्यात येईल. नोंदणीकृत क्रिडा असोसिएशनने प्राधिकृत केलेल्या क्रिडा स्पर्धांचा प्रमाणपत्रावर तालुका/जिल्हा क्रिडा अधिकारी यांची स्वाक्षरी असल्यास अधिभार द्यावा.

४.३.११ स्वातंत्र्यसैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्यसैनिकांचा मुलगा/मुलगी, मुलाचा/मुलीची, मुलगा/मुलगी यांना खालील अटींच्या अधीन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा स्वातंत्र्यसैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांचे सहीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यसैनिक यांचे खालील मुद्यांवरील रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

अ) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.

ब) स्वातंत्र्यसैनिक ह्या सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.

क) स्वातंत्र्यसैनिक ह्या सवलतीचा उपयोग कुठल्याही नातेवाईकासाठी, जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही.

४.३.१२ उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास संबंधीत सैन्याधिकारी/जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचा विहित नमुन्यातील दाखला जोडावा.

४.३.१३ उमेदवाराचे आई/वडील कृषि विद्यापीठे/कृषि परिषदेचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.

४.३.१४ उमेदवार अपंग असल्यास त्याने जिल्हा शल्यचिकित्सक किंवा जिल्हा शासकीय रुग्णालय किंवा वैद्यकीय मंडळ यांनी दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. प्रमाणपत्रामध्ये अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.

४.३.१५ स्वत:ची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल.)

४.३.१६ अर्जासोबत सन २०१०-११ या आर्थिक वर्षाचा तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

४.३.१७ आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सन २०१०-११ या वर्षाचा तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गासाठी उत्पन्नाची मर्यादा रुपये १ लाखपर्यंत आहे.

४.४ सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेपूर्वी किंवा तोपर्यंत प्राप्त झालेला अर्ज प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.

४.५ अपूर्ण भरलेले प्रवेश अर्ज खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे रद्द करण्यात येतील.

४.५.१ उमेदवाराने स्वत:ची स्वाक्षरी न केलेला अर्ज

४.५.२ सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित केलेल्या नसतील तर

४.५.३ उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा अधिक असेल तर

४.५.४ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेचे गुणपत्रक जोडलेले नसल्यास

४.६ मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी किंवा गणुवत्ता यादी तयार करताना दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समसमान गुण असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अनुक्रमे अवलंब करण्यात येईल.

४.६.१ इयत्ता १० वी मध्ये उच्चतम गुणांची टक्केवारी

४.६.२ कमीत कमी प्रयत्नात इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेला उमेदवार

४.६.३ वयाने लहान असलेला उमेदवार

४.६.४ आडनावातील इंग्रजी आद्य अक्षरांचा क्रम.

४.७ प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर कोणतीही अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

## ५. प्रवेश पध्दत

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकणकृषी विद्यापीठ, दापोली मत्स्यअभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबवेल. प्रवेश प्रक्रियेसंबंधीची माहीती पुस्तिका व प्रवेश अर्ज डॉ. बाळासाहेब सावंत कोकणकृषी विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच मत्स्यमहाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे देखील उपलब्ध होऊ शकेल. सदरची माहीती पुस्तिका व प्रवेश अर्ज पोस्टाने पाठविण्यात येणार नाही.

५.१ अर्जदाराने प्रवेश अर्जाबद्दल अधिक माहिती हवी असल्यास मत्स्यमहाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी, येथे संपर्क साधावा. (फोन : ०२३५२-२३२२४१, २३२६७८, फॅक्स : ०२३५२-२३२९८७,Email ID :cofrtn@yahoo.com)

५.२ मत्स्यमहाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे कार्यालयीन वेळेत व कामकाजाच्या दिवशी दिनांक १०/०६/२०११ पासुन १२/०७/२०११ पर्यंत रक्कम रु. २५/- रोखीने (पंचविस मात्र) भरुन अर्जदाराला प्रवेश अर्ज आणि माहीती पुस्तिका मिळेल.

५.३ अर्जदाराला प्रवेश अर्ज आणि माहिती पुस्तिका www.dbskkv.org या संकेत स्थळावर उपलब्ध असेल. या संकेत स्थळावरुन उमेदवाराने जर माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज उपलब्ध करुन घेतला असेल तर तो पूर्ण भरलेला प्रवेश अर्ज विद्यापीठाला सादर करते वेळी रु. २५/- चा डिमांड ड्राफ्ट डॉ. बाळासाहेब सावंत कोकणकृषी विद्यापीठ, दापोली यांचे नावे जोडणे आवश्यक आहे.

५.४ अर्जदाराने पूर्ण भरलेला प्रवेश अर्ज, आवेदन शुल्क (खुला संवर्ग रु. ३००/- आणि राखीव संवर्ग रु. १५०/-) रोखीने भरुन आवश्यक त्या कागद पत्रांच्या साक्षांकित प्रतिसह मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे दिनांक १२/०७/२०११ पर्यंत जमा करावा.

५.५ दिनांक १२/०७/२०११ नंतर सादर केलेल्या प्रवेश अर्जाचा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.

५.६ उमेदवाराचा अधिवास सादर केलेल्या अनुक्रम अधिवास दाखला डोमिसाईल सर्टिफिकेट, ७/१२ चा उतारा, शाळा सोडल्याचा दाखला, १० वी गुणपत्रिका यावरुन निश्चित केला जाईल.

५.७ प्राप्त झालेल्या अर्जावरुन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि मत्स्यमहाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द केली जाईल. तसेच ही यादी विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

५.८ तात्पुरती गुणवत्ता यादीसंबंधी काही तक्रार असल्यास लेखी स्वरुपातील अर्ज पुराव्यासह मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली किंवा मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे विहीत वेळेत सादर करावा.

५.९ तात्पुरती गुणवत्ता यादीसंबंधीच्या तक्रारीबाबत विद्यापीठ स्तरीय तक्रार निवारण समिती योग्य ते निर्णय घेऊन ते सर्व निर्णय मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरीला कळविण्यात येतील. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी मा. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे प्रसिध्द करण्यात येईल. तसेच ही यादी विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

५.१० अंतिम प्रवेश यादी प्रसिध्द झाल्यानंतर, उमेदवाराने मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे विहीत प्रवेश शुल्क, प्रथम सत्र शुल्क आणि मुळ कागद पत्रासह प्रवेश कार्यक्रम पत्रिकेनुसार प्रवेश घेण्यासाठी मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी येथे स्वत: उपस्थित रहावे.

५.११ प्रवेश देते वेळी, मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे प्राचार्य आपल्याच विद्यालयात प्रवेश कार्यक्रम पत्रिकेनुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण करतील.

५.१२ महाराष्ट्र कृषी विद्यापीठ नियम एक्स एल आय, १९८३ सेक्शन ५ नियमातील तरतुदीनुसार जो उमेदवार किंवा ज्याचे पालक कमीतकमी ३ वर्ष महाराष्ट्राचे रहीवासी असतील त्या सर्वांसाठी मत्स्य अभियांत्रिकी पदविकेसाठी प्रवेश खुला असेल. हा कालावधी प्रवेश निश्चितीपुर्वीच्या १० वर्षांपर्यंत ग्राह्य धरला जाईल. ज्या उमेदवाराचा किंवा ज्याच्या पालकांचा आधिवास प्रवेश प्रक्रियेपुर्वी १० वर्षाच्या आतील कालावधीतील नसेल तर त्यांची प्रवेशसंख्या एकूण प्रवेशाच्या २ टक्के इतकी सिमित करण्यात येईल.

५.१३ मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कृषी विद्यापीठ परिसरांतर्गत येणाऱ्या शाळेंमधून, शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी एकूण प्रवेश संख्येच्या ७० टक्के जागा ह्या विद्यापीठ कोटा (U - quota) म्हणून राखीव ठेवल्या जातील व उर्वरीत ३० टक्के जागा राज्यातील इतर उमेदवारांसाठी महाराष्ट्र कोटा (M- quota) म्हणून ग्राह्य धरल्या जातील.

५.१४ मत्स्य अभियांत्रिका पदविका अभ्यासक्रम विद्यालयातील प्राचार्याने सर्व रिक्त जागांचा तपशिल विद्यापीठाला जमा करावा.

५.१५ पहिल्या फेरी प्रमाणेच उर्वरित रिक्त जागासाठी दुसरी फेरी राबविण्यात येईल.

५.१६ दुसऱ्या फेरी नंतर रिक्त राहीलेल्या जागांसाठी संवर्ग बदलून शासकिय नियमानुसार तिसरी फेरी राबविण्यात येईल.

५.१७ तिसरी फेरी संपल्यानंतर विद्यापीठ स्तरीय फेरी राबविण्यात येईल.

५.१८ रिक्त राहीलेल्या जागांसाठी आवश्यकता वाटल्यास पुनश्च: जाहिरात प्रसिध्द करुन प्रवेश अर्ज मागविले जातील आणि ज्या उमेदवारांस काही कारणास्तव पुर्वीच्या फेऱ्यांमध्ये प्रवेश मिळाला नसेल त्या उमेदवारांचा प्रवेश अर्ज पुर्नविचारात घेतला जाईल. त्यानुसार मत्स्य महाविद्यालय, शिरगाव, रत्नागिरी गुणवत्तेवरुन प्रसिध्द केलेल्या अंतिम यादीनुसार प्रवेश प्रक्रिया राबवेल.

## ६. आरक्षित जागा

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठांतर्गत संस्थेमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | वर्ग | आरक्षित जागांची टक्केवारी | |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतून बौध्दधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ | |
| २ | अनुसूचित जमाती | ७ | |
| ३ | अ. विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३ | नॉनक्रीमीलेअर तत्त्व लागू आहे. |
| | ब. भटक्या जमाती ब (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५ | |
| | क. भटक्या जमाती क (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ | |
| | ड. भटक्या जमाती ड (वंजारी व तत्सम जमाती) | २.० | |
| ४ | इतर मागास वर्ग | १९ | |
| | **एकूण** | **५०** | |
| ५ | शेतकऱ्यांची मुले | ६ | |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले | २ | |
| ७ | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापित पुनर्वसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापित व्यक्ती आणि त्यांची मुले | ४ | |
| ८ | आजी व माजी सैनिकांची मुले | २ | |
| ९ | अपंग (४० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकीत्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) | ३ | |
| १० | महिला | ३० | |

६.१ अनुक्रमांक ५ ते ९ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे.

६.२ भारतीय संविधानानुसार मंडळ आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजना विभाग क्र. टीईएम १०२४/(६३०३) तांशि-१ दिनांक ३ जून १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात येतील.

६.३ गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीस प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागेवर एकूण प्रवेशक्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीस उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. (नॉन-क्रीमीलेअर दाखला आवश्यक)

६.४ रिक्त जागांवार विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेशक्षमतेच्या कमाल २ टक्के जागांवार प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात येतील, जसे अ.जा/अ.ज/वि.जा/भ.ज. आणि इतर मागासवर्गीय. तथापि, या पध्दतीने आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास, त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६.५ संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

६.६ शासन निर्णय क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र. १५/मावक ५, दिनांक ५/६/२००६ अन्वये विमुक्त जाती अ,ब, भटक्या जमाती क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास वर्ग यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी क्रीमीलेअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा, सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही, म्हणजेच तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

६.७ शासन निर्णय क्रमांक अेजीयु–२१९५/सीआर–७३/१९ अे, दिनांक ३/१/२००१ नुसार वरील प्रत्येक संवर्गात ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत. त्यात गुणवत्तेनुसार प्रवेश दिलेल्या मुलींचा समावेश असेल.

## ७. अधिभार

विद्यापीठाने पुरस्कृत केलेल्या मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी खालीलप्रमाणे जादा अधिभार गुण देण्यात येतील.

अधिभार गुण (जास्तीत जास्त २० गुण)

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवार शेतकरी कुटुंबातील असल्यास तलाठ्याच्या स्वाक्षरी आणि दिनांकासहीत अलिकडील (२०१०–२०११) चा ७/१२ चा उतारा अथवा भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील उमेदवार असल्यास, तहसिलदार यांचे प्रमाणपत्र जोडावे.<br>**किंवा**<br>उमेदवार मासेमार कुटुंबातील असल्यास बंदर अधिनियम XIX १८३८ च्या कलमानुसार बंदर अधिकारी यांचे स्वाक्षरी आणि दिनांकासहीत नौका नोंदणी प्रमाणपत्र. अथवा नौकाहीन मासेमार कुटुंबातील उमेदवार असल्यास, तहसिलदार यांचे प्रमाणपत्र जोडावे. | १२ टक्के |
| २ | उमेदवार तालुका/जिल्हा/राज्य स्तरावरील सांस्कृतिक कार्यक्रमात/क्रीडा स्पर्धेत भाग घेतला असल्यास जिल्हा शिक्षणाधिकारी / संचालक, सांस्कृतिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे शालान्त परीक्षा किंवा तत्पूर्वीचे प्रमाणपत्र जोडावे. | २ टक्के |
| ३ | उमेदवार एन.सी.सी/एम.सी.सी/स्काऊट गाईड सदस्य असल्यास शालान्त परीक्षा किंवा तत्पूर्वीचे समादेशकाचे किंवा मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र जोडावे. | २ टक्के |
| ४ | आपण कृषि परिषद/कृषि विद्यापीठ/सेवानिवृत्त /मयत कर्मचाऱ्याचा मुलगा/मुलगी असल्या संबंधीत कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडावे. | ३ टक्के |

## ८. अभ्यासक्रम अध्यापन आणि मूल्यमापन

८.१ मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम (१० + ३) विषयांची आखणी
(अभ्यासक्रमाचे माध्यम – इंग्रजी)

| | | क्रेडीटस् | | |
|---|---|---|---|---|
| | | बौध्दीक | प्रात्यक्षिक | एकूण |
| **प्रथम वर्ष – पहिले सत्र :** | | | | |
| १ | इंग्रजी | १ | ० | १ |
| २ | मूलभूत गणित | १ | १ | २ |
| ३ | संगणकाची मूलतत्वे | १ | २ | ३ |
| ४ | अभियांत्रिकी चित्रकला | १ | २ | ३ |
| ५ | कार्यशाळेचा मुलभूत सराव (विद्युत आणि इलेक्ट्रॉनीक्स) | ० | २ | २ |
| ६ | मासे, मृदूकाय व कवचधारी जलचरांचे वर्गीकरण | १ | २ | ३ |
| ७ | जलसंवर्धनाची मुलतत्वे | १ | २ | ३ |
| ८ | व्यवसाय संस्था व वैयक्तिक व्यवस्थापन | १ | ० | १ |
| ९ | आपत्ती व्यवस्थापन | १ | १ | २ |
| | | **८** | **१२** | **२०** |
| **प्रथम वर्ष – द्वितीय सत्र :** | | | | |
| १ | मूलभूत भौतीक शास्त्र | १ | १ | २ |
| २ | माहिती तंत्रज्ञान | १ | १ | २ |
| ३ | कार्यशाळेचा मुलभूत सराव (बांधकाम आणि मेकॅनिकल) | ० | २ | २ |
| ४ | विद्युत आणि इलेक्ट्रॉनीक्स आणि संदेशवहन | ० | २ | २ |
| ५ | कार्यशाळा तंत्रज्ञान | ० | २ | २ |
| ६ | मासे, मृदूकाय व कवचधारी जलचरांचे जीवशास्त्र | ० | २ | २ |
| ७ | जलजीवशास्त्र | १ | १ | २ |
| ८ | मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | १ | २ | ३ |
| ९ | मासळीचे बाजारपेठ व्यवस्थापन | १ | १ | २ |
| १० | मत्स्य व्यवसायातील विपणन | १ | ० | १ |
| | | **६** | **१४** | **२०** |
| **द्वितीय वर्ष – तिसरे सत्र :** | | | | |
| १. | मासेमारी नौका तंत्रज्ञान – १ | १ | २ | ३ |
| २ | मासेमारी जाळे तंत्रज्ञान – १ | १ | २ | ३ |
| ३ | मरीन इंजीन – १ | १ | २ | ३ |
| ४ | नौकानयन | १ | २ | ३ |
| ५ | सीमॅनशीप | ० | २ | २ |

| | | | क्रेडीटस् | |
|---|---|---|---|---|
| | | **बौध्दीक** | **प्रात्यक्षिक** | **एकूण** |
| ६ | शीतप्रक्रिया तंत्रज्ञान - १ | १ | २ | ३ |
| ७ | मत्स्य शेती अभियांत्रिकी | १ | १ | २ |
| ८ | बंदर अभियांत्रिकी | १ | ० | १ |
| | | **७** | **१३** | **२०** |
| **द्वितीय वर्ष - चतुर्थ सत्र :** | | | | |
| १ | मरीन इंजीन - २ | १ | २ | ३ |
| २ | बीजनिर्मिती अभियांत्रिकी | १ | १ | २ |
| ३ | शीत प्रक्रिया तंत्रज्ञान - २ | १ | २ | ३ |
| ४ | मत्स्य प्रक्रिया यंत्रसामुग्री | १ | २ | ३ |
| ५ | मासेमारी नौका तंत्रज्ञान - २ | १ | २ | ३ |
| ६ | मासेमारी जाळे तंत्रज्ञान - २ | १ | २ | ३ |
| ७ | मोसमारी तंत्रज्ञान | १ | २ | ३ |
| | | **७** | **१३** | **२०** |
| **तृतीय वर्ष - पाचवे सत्र :** | | | | |
| १ | प्रात्यक्षिक प्रशिक्षण (प्रात्यक्षिक ज्ञान) | ० | २० | २० |
| | अ. मासेमारी नौका बांधणी व मरीन इंजिन | | | |
| | ब. मासेमारी तंत्रज्ञान | | | |
| | क. मत्स्य प्रक्रिया आणि शीतकीकरण यंत्रसामुग्री | | | |
| | ड. मत्स्य संवर्धन अभियांत्रिकी | | | |
| | | **०** | **२०** | **२०** |
| **तृतीय वर्ष - सहावे सत्र :** | | | | |
| १ | मत्स्य अभियांत्रिकी औद्योगिक कार्यानुभव (कारखान्यातील प्रशिक्षण) | ० | २० | २० |
| | अ. मासेमारी नौका बांधणी व मरीन इंजिन | | | |
| | ब. मासेमारी तंत्रज्ञान | | | |
| | क. मत्स्य प्रक्रिया आणि शीतकीकरण यंत्रसामुग्री | | | |
| | ड. मत्स्य संवर्धन अभियांत्रिकी | | | |
| | | **०** | **२०** | **२०** |
| | **एकूण क्रेडीटस्** | **२८** | **९२** | **१२०** |

८.२ मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम हा तीन वर्षे कालावधीचा असून यामध्ये एकूण सहा सहामाही सत्रांचा समावेश असेल.

८.३ पदविका तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे निर्धारित केलेल्या नियमानुसार सहामाही

परीक्षा पध्दतीने मूल्यमापन करण्यात येईल.

८.४ पदविका अभ्यासक्रमाच्या मध्य सत्रांत (Mid-Term) परीक्षा या मत्स्य अभियांत्रिकी पदविका विद्यालयांमार्फत घेतल्या जातील.

८.५ विद्यार्थ्यांना क्षेत्रीय प्रात्यक्षिके पूर्ण करावी लागतील. ही प्रात्यक्षिके अभ्यासक्रमानुसार आणि विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार असतील.

८.६ पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या सहामाही (Semester-end) परीक्षा विद्यापीठामार्फत घेतल्या जातील. पहिली सहामाही परीक्षा डिसेंबर मध्ये आणि दुसरी सहामाही परीक्षा एप्रिल/मे मध्ये घेतल्या जातील.

८.७ प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान शेकडा ५५ गुण (१ ते १० गुणक पध्दतीने ५.५) बौध्दिक व प्रात्यक्षिक परीक्षेत स्वतंत्रपणे मिळविणे अनिवार्य आहे. दोन्हींपैकी एखाद्या भागात विद्यार्थी नापास असेल, तर बौध्दिक आणि प्रात्यक्षिक अशी दोन्हींची त्याला परत परीक्षा द्यावी लागेल.

८.८ विद्यापीठाच्या प्रचलित गुण पध्दतीनुसार १ ते १० गुणक पध्दतीने एकत्रित गुणकांच्या सरासरी नुसार पुढीलप्रमाणे श्रेणी ठरविण्यात येईल.

अ) एकत्रित गुणकांची सरासरी ८.५० व त्यापेक्षा जास्त : प्राविण्यासह प्रथम श्रेणी

ब) एकत्रित गुणकांची सरासरी ७.५० ते ८.४९ : प्रथम श्रेणी

क) एकत्रित गुणकांची सरासरी ६.०० ते ७.४९ : द्वितीय श्रेणी

ड) एकत्रित गुणकांची सरासरी ५.५० ते ५.९९ : उत्तीर्ण श्रेणी

८.१२ एखाद्या विद्यार्थ्याला काही विषयांमध्ये कमी गुण मिळून सदरचा विद्यार्थी जर नापास होत असेल तर ५ गुणांचा अधिभार जास्तीत जास्त दोन विषयांकरिता देण्यात येईल तसेच अधिभार दिल्यानंतर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणांची टक्केवारी विचारात घेवून श्रेणी देण्यात येईल.

८.१३ निकाल समितीने तयार केलेला निकाल कुलसचिव, कुलगुरुंच्या मान्यतेसाठी सादर करतील आणि कुलगुरुंनी संमत केलेला निकाल कुलसचिव जाहीर करतील.

**९ प्रमाणपत्र**

९.१ विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले प्रमाणपत्र विद्यापीठाच्या शिक्षण संचालकांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाद्वारे प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला देण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यास रुपये १००/- (रुपये शंभर मात्र) इतके शुल्क विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

९.२ संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी शिफारस केल्यास तृतीय वर्षाची अंतीम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला रु. २५/- (रुपये पंचवीस मात्र) इतके शुल्क भरल्यास उपकुलसचिव (विद्या) यांच्या स्वाक्षरीने तात्पुरते प्रमाणपत्र देण्यात येईल.

**१०. परीक्षा शुल्क, परीक्षेचा अर्ज, प्रवेश पत्र इत्यादी**

१०.१ विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेले परीक्षा शुल्क आणि गुणपत्रक शुल्क मत्स्य अभियांत्रिकी विद्यालयाच्या प्राचार्यांकडे भरावे लागेल आणि प्राचार्य अर्जाची संपूर्ण छाननी करुन ते अर्ज आणि शुल्क डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नावे करुन, विद्यापीठाच्या कुलसचिवांकडे पाठवतील.

१०.२ कुलसचिवांच्या अधिपत्याखालील शिक्षण विभाग, सर्व अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांकाचे प्रवेश पत्र देईल.

१०.३ विद्या परिषदेने संमत केलेल्या कार्यक्रमानुसार कुलसचिव या अभ्यासक्रमाच्या सहामाही परीक्षा प्रति वर्षी डिसेंबर मध्ये आणि दुसरी सहामाही वार्षिक परीक्षा एप्रिल/मे मध्ये आयोजित करतील.

## ११. वैद्यकीय प्रमाणपत्र

या अभ्यासक्रमासाठी निवडलेला विद्यार्थी आरोग्यदृष्ट्या सुदृढ आणि सक्षम असला पाहिजे. याकरिता त्याने प्रवेश घेतेवेळी शासकीय मान्यताप्राप्त सक्षम आरोग्य अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात सही शिक्क्यानिशी सादर करावे.

## १२. उपस्थिती

अंतिम परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रत्येक सहामाही सत्रात एकूण ८० टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती असणे आवश्यक आहे. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत वैद्यकीय अथवा तत्सम कारणास्तव मत्स्य अभियांत्रिकही पदविका अभ्यासक्रम विद्यालयाचे प्राचार्य उपस्थितीत ५ टक्के सवलत देतील.

याकरिता संबंधित विद्यालयाच्या प्राचार्यांकडे विद्यार्थ्यांने आवश्यक त्या दाखल्यासह अर्ज सादर करावा.

## १३. पुन:प्रवेश

एखाद्या विद्यार्थ्यांने मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम मध्येच सोडून नंतर पुन:प्रवेशासाठी अर्ज केल्यास अशा प्रकरणामध्ये विद्यार्थ्याची प्रथम वर्षातील हजेरी ८० टक्के भरलेली असावी. अशा विद्यार्थ्यांचाच पुन:प्रवेशसाठी विचार केला जाईल. तसेच पाच वर्षाच्या आत अशा विद्यार्थ्यांस पुन:प्रवेश घेता येईल. परंतू, त्या वेळेस सदरचा अभ्यासक्रम चालू असणे गरजेचे आहे.

## १४. विद्यार्थ्यांची जबाबदारी

मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्वसामान्य बाबींची पूर्णपणे माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांनी या बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील असणे अपेक्षित आहे. त्यांनी विद्यालयाशी सतत संपर्क साधून असले पाहिजे. केवळ नियमाविषयी अज्ञान हे त्या अस्वीकृतीला कारण होऊ शकणार नाही.

## १५. शैक्षणिक सहली

निर्धारित केलेल्या शैक्षणिक सहलींचे आयोजन अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल. "भारताच्या दक्षिण किनारपट्टीवरील १५ दिवसांची शैक्षणिक सहल" या सहलीचे आयोजन तृतीय सत्राच्या परीक्षेनंतर असलेल्या सुट्टीच्या कालावधीत करण्यात येईल. या सहलीच्या १५ दिवसांच्या कालावधीत विद्यार्थी भारताच्या दक्षिण किनारपट्टीवरील मत्स्य अभियांत्रिकी संस्था, मत्स्य अभियांत्रिकी कार्यशाळा, विविध प्रकारचे नौका बांधणी प्रकल्प, मत्स्य व कोळंबी बीजोत्पादन व संवर्धन प्रकल्प, मत्स्य प्रक्रिया केंद्र, विविध प्रकारच्या अद्यावत मासेमारी नौका, अद्यावत मोसमारी बंदरे इ. स्थळांना भेटी देतील.

## १६. वसतीगृह निवास

सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मर्यादित प्रमाणात विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह निवास व्यवस्था उपलब्ध आहे. प्रवेश देण्यात आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांस संबंधित शिक्षण संस्थेच्या वसतीगृहामध्ये निवासाची सोय उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

## १७. अनुचित गैरशिस्त वर्तन

विद्यापीठामध्ये प्रचलित असलेल्या विनियम व परिनियमातील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीबाबत अथवा गैरशिस्तीबाबत कार्यवाही केली जाईल.

## १८. शैक्षणिक शुल्क

मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी निर्धारीत केलेल्या वार्षिक शुल्काचा तपशील. नमूद केलेले शुल्क राज्य परिषदेच्या संमत्तीने बदलाधीन आहे.

| अ.क्र. | शुल्काचा तपशील | मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम विद्यालयांची शुल्क आकारणी | |
|---|---|---|---|
| | | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| अ) शुल्क (रुपये) | | | |
| १ | शिक्षण शुल्क | ३००० | ३००० |
| २ | नोंदणी शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | २०० | २०० |
| ३ | प्रवेश शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | १०० | -- |
| ४ | वाचनालय शुल्क | ४०० | ४०० |
| ५ | परीक्षा शुल्क प्रती विद्यार्थी (विद्यापीठाकडे जमा) | १००० | -- |
| ६ | अनामत शुल्क (परत होणारे) | १०००** | -- |
| ७ | गुणपत्रक शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | १०० | १०० |
| ८ | विद्यार्थी कल्याण परिषद शुल्क | १०० | -- |
| ९ | i) जिमखाना शुल्क | ५०० | ५०० |
| | ii) वार्षिक पारितोषिक प्रदान समारंभ | २०० | -- |
| | iii) विद्यालयाचे मुखपत्र | २०० | -- |
| | iv) अश्वमेध शुल्क | ३० | -- |
| १० | ओळखपत्र | ५० | -- |
| ११ | वैद्यकीय शुल्क | १०० | -- |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | ६ | -- |
| १३ | विद्यार्थी निधी | १०० | -- |
| | **अ एकूण** | **७०८६** | **४२००** |
| ब) | वसतीगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फक्त | | |
| १४ | वसतीगृह शुल्क | १०००** | -- |
| १५ | वसतीगृह परिक्षण आकार | १००० | १००० |
| १६ | भोजनगृह आगावू रक्कम | ६०० | -- |
| १७ | विद्युत बील आकार | १००० | १००० |
| | **एकूण ब** | **३६००** | **२०००** |
| | **एकूण (अ + ब)** | ७०८६ + ३६०० = **१०६८६** | ४२०० + २००० = **६२००** |

** विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम

**टिप :**

१. वसतीगृह शुल्क, भांडी शुल्क, मेस डिपॉझिट, विद्युत आकार हे प्रवेशाचे वेळी घेण्यात येऊ नये. प्रवेश नियमीत झाल्यानंतर उपरोक्त सेवा उपलब्ध असल्यास याबाबतचे शुल्क आकारण्यात यावे. सेवा उपलब्ध नसल्यास शुल्क आकारु नये.

२. अनामत रक्कम, मेस डिपॉझिट इ. रकमा तिसरे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना परत करण्यात याव्यात.

३. एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश प्रक्रियेच्या अंतीम फेरीपुर्वी प्रवेश रद्द केल्यास, फक्त प्रवेश शुल्क वजा करुन उर्वरित रक्कम परत केली जाईल. अंतीम फेरीनंतर प्रवेश रद्द केल्यास, फक्त अनामत रक्कम परत केली जाईल. मात्र प्रवेश रद्द करणाऱ्या उमेदवारास प्रवेश रद्द करण्याचे शुल्क रुपये ३००/- विद्यापीठाकडे भरणा करावी लागेल त्यानंतर त्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

## १९. सूचना

१९.१ विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क, शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क, जिमखाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम भरल्यानतंरच, प्रवेश दिला आहे असे समजण्यात येईल.

१९.२ मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम विद्यालयात प्रवेश घेतल्या नंतर प्रवेश रद्द करणाऱ्या उमेदवाराला प्रवेश रद्द करण्याचे शुल्क रुपये ३००/- विद्यापीठात भरावे लागेल. त्यानंतरच त्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

१९.३ विद्यार्थ्यांची प्रतीवर्षी विद्यालयाच्या मार्फत वैद्यकीय तपासणी केली जाईल.

१९.४ विद्यार्थी सुरक्षा विमा : विद्यालयाच्या मार्फत विद्यार्थ्यांचा गट विमा काढला जाईल.

## २० मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम प्रवेश कार्यक्रम २०११-१२

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज विक्री सुरु होण्याचा दिनांक | १०/०६/२०११ |
| २ | अर्ज विक्री व संपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | १२/०७/२०११ |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २०/०७/२०११ |
| ४ | तक्रार अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | २५/०७/२०११ |
| ५ | तक्रार निवारण समितीची बैठक | २९/०७/२०११ |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०२/०८/२०११ |
| ७ | पहिली प्रवेश यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०५/०८/२०११ |
| ८ | प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीचा कालावधी | ०८/०८/२०११ ते ११/०८/२०११ |
| ९ | प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीचा कालावधी | १७/०८/२०११ ते २०/०८/२०११ |
| १० | प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या फेरीचा कालावधी | २४/०८/२०११ ते २७/०८/२०११ |
| ११ | विद्यापीठस्तरीय प्रवेश फेरी | ०५/०९/२०११ ते ०८/०९/२०११ |
| १२ | शैक्षणिक वर्ष सुरु होण्याचा दिनांक | १२/०९/२०११ |

परिशिष्ठ – १

## शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र (नमूना)

## (तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्या सहीचे)

१) श्री/श्रीमती ______________________ राहणार ______________

ता. __________ जि. __________ भूमीहीन असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ शेतमजूरीवर चालतो.
त्यांनी __________ या साली श्री./श्रीमती ______________

(जमीनधारकाचे नाव) मौजे. __________ ता. __________ जि. __________

यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम केले आहे.

२) खाली नमूद केलेला पुरावा तपासल्यानंतर श्री./श्रीमती ______________

(उमेदवाराचे नाव) हे वरील शेतमजुराचा/ची मुलगा/मुलगी/पत्नी आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

पुरावा – १) ______________________

______________________

सील

स्थळ :

दिनांक : सही

हुद्दा

टिप:

१) जे उमेदवार भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील आहेत असा दावा करतात व ज्यांच्या कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न शेतमजूरीवरच आहे अशांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) हे प्रमाणपत्र उमेदवाराच्या किंवा त्यांच्या इतर नातेवाईकांच्या नावाने असल्यास अधिभार देण्याच्या दृष्टीने ग्राह्य धरले जाणार आहे.

३) ज्याची जरुरी नाही ते खोडावे.

४) ह्या प्रमाणपत्रात संबंधित शेतमजूर या जमीनधारकाच्या शेतावर काम करतात, त्या जमीनधारकाचे संपूर्ण नाव इत्यादी सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे, अन्यथा यासंबंधी अधिभार देता येणार नाही.

परिशिष्ठ – १

## मासेमार असल्याचे प्रमाणपत्र (नमूना)
## (तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्या सहीचे)

१) श्री/श्रीमती ________________ राहणार ________________

ता. ____________ जि. ____________ नौकाहीन असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ मासेमारीवर चालतो. त्यांनी ____________ या साली श्री./श्रीमती ________________

(नौकाधारकाचे नाव) मौजे. ____________ ता. ____________ जि. ____________

यांच्या नौकेवर मासेमार म्हणून काम केले आहे.

२) खाली नमूद केलेला पुरावा तपासल्यानंतर श्री./श्रीमती ________________

(उमेदवाराचे नाव) हे वरील मासेमाराचा/ची मुलगा/मुलगी/पत्नी आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

पुरावा – १) ________________

________________

सील

स्थळ :

दिनांक : सही

हुद्दा

टिप:

१) जे उमेदवार नौकाहीन मासेमार कुटुंबातील आहेत असा दावा करतात व ज्यांच्या कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न मासेमारीवर आहे अशांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) हे प्रमाणपत्र उमेदवाराच्या किंवा त्यांच्या इतर नातेवाईकांच्या नावाने असल्यास अधिभार देण्याच्या दृष्टीने ग्राह्य धरले जाणार आहे.

३) ज्याची जरुरी नाही ते खोडावे.

४) ह्या प्रमाणपत्रात संबंधित मासेमार या नौकेवर काम करतात, त्या नौकाधारकाचे संपूर्ण नाव इत्यादी सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे, अन्यथा यासंबंधी अधिभार देता येणार नाही.

परिशिष्ठ – २

**शेतकरी असल्याचा दाखला (नमूना)**

**(तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्या सहीचे)**

दाखला देण्यात येतो की, श्री./कुमार/श्रीमती ____________________

(अर्जदाराचे नाव) यांचे श्री./श्रीमती ____________________

आई/वडील/आजोबा/आजी (पितृकुलाकडील जमीनधारक) राहणार ____________________

ता. ____________ जि. ____________ यांनी जमीन मालक या नात्याने धारण केलेले जमीन क्षेत्र, हेक्टर आर हे जमीन महसूल कायदा ____________ प्रमाणे मर्यादित आहे.

असेही प्रमाणित करण्यात येते की, ते/त्या स्वत: शेती करीत असून शेती हेच त्यांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

सील

स्थळ :

दिनांक : सही

हुद्दा

---

परिशिष्ठ – २

**मासेमार असल्याचा दाखला (नमूना)**

**(तहसिलदार/नायब तहसिलदार/बंदर अधिकारी यांच्या सहीचे)**

दाखला देण्यात येतो की, श्री./कुमार/श्रीमती ____________________

(अर्जदाराचे नाव) यांचे श्री./श्रीमती ____________________

आई/वडील/आजोबा/आजी (पितृकुलाकडील नौकाधारक) राहणार ____________________

ता. ____________ जि. ____________ यांनी नौकामालक या नात्याने धारण केलेली नौका नोंदणी क्रमांक हे बंदर अधिनियम XIX १८३८ च्या कलमानुसार प्रमाणित मर्यादित आहे.

असेही प्रमाणित करण्यात येते की, ते/त्या स्वत: मासेमारी करीत असून मासेमारी हेच त्यांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

सील

स्थळ :

दिनांक : सही

हुद्दा

परिशिष्ठ - ३

**वैद्यकीय दाखला (नमूना)**

**(सक्षम नोंदणकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला)**

(प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल)

मी प्रमाणित करतो की कुमार/कुमारी ______________________________

याची/हिची संपूर्ण वैद्यकीय तपासणी केली आहे व त्यावरुन खालीलप्रमाणे दाखला देत आहे.

१) त्याला/तिला काहीही दृष्टीदोष नाही.

२) त्याला/तिला श्रवणशक्तीचा कुठलाही त्रास नाही.

३) त्याला/तिला कुठलाही आजार नाही, शारीरिक व्यंग किंवा मानसिक वैगुण्य नाही जेणेकरुन सध्या किंवा भविष्यात तो/ती दैनंदिन कामकाजात किंवा अध्ययनास (नौकेवरील किंवा प्रयोगशाळेतील कामास) अपात्र ठरेल.

(विद्यार्थ्यांची सही) नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याची सही

ठिकाण : नांव :

दिनांक : नोंदणी क्रमांक :

टिप : १. वैद्यकीय प्रमाणपत्र वरील विहित नमुन्यातच सादर करावे.

२. वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवेत असल्यास दाखल्यावर कार्यालयाचे सील असणे आवश्यक आहे.